# सुधांशु

(चंद्रावरील कवितांचा संग्रह)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**सुधांशू** (चंद्रावरील कवितांचा संग्रह)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : फाल्गुन शु. १३, शके १९४५,
शुक्रवार, दि. २२ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-970674-9-5

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ १२०/-

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण

ज्या शीतल चंद्रदेवतेच्या
आल्हाददायी श्वेत किरणांमध्ये
अमृताचा पाझर होतो
त्या चंद्राला,
ज्याने हजारो वर्षांपासून
कवींना, लेखकांना
एक प्रेरणा दिली
त्या सोम चंद्राला
हा चंद्रावरील कवितांचा
संग्रह कृतज्ञतेने समर्पित!

# मनोगत

पृथ्वीचा आणि चंद्राचा वैज्ञानिक संबंध जो असेल तो असेल परंतु वसुंधरेचे आणि चंद्रम्याचे भावनिक बंध अनोखे आहेत. मनाच्या अगदी जवळचा चंद्र असतो. 'चंद्रमा मनसो जात:' असं ज्योतिषशास्त्र (म्हणजेच नक्षत्रशास्त्र, खगोलशास्त्र) सांगतं. मनापासून (ईश्वराच्या) चंद्राची उत्पत्ती झालेली आहे. त्यामुळे मानवी मनाच्या सर्व आंदोलनांवरही चंद्राचीच सत्ता असते.

चंद्र सौंदर्याचा प्रतीक जसा तसाच तो आल्हादकतेचा साठाही असतो. तो अमृत ओसंडवणारा अमृतमय शशी आणि चांदण्याची शीतल बरसात करणारा तारेशही असतो. तो कल्पनेतला उपमान तर प्रीतीतलं प्रमाण असतो. त्यात कोजागर्तीची लक्ष्मी निवास करते, त्यात आरोग्यलक्ष्मी राहते, त्यात औषधच राहतं, त्यात पोषकत्व वसतं. तो गजेशाचा भालचंद्र तर शिवाचा शिरोधार्य ठरतो. तो रोहिणीसह २७ नक्षत्रांचा स्वामी तर कवीच्या साहित्यविश्वातला लखलखणारा प्रतिभा प्रेरक ठरतो.

चंद्राला पाहून प्रेयसीची आठव जागी होते. यात नवल ते काय? चंद्राची रात्र, चांदण्याची निशा, पौर्णिमेचा चंद्र, चंद्राची कोर या साऱ्यांशी संबंधित मन:पटलावर उमटलेले काव्य लेखा म्हणजे हा काव्यसंग्रह होय. या सुधांशुत रसिकवरांनी मनसोक्त डुंबत त्यातील काव्यामृताचं प्राशन करावं यासाठी अभ्यर्थता !

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

डॉ. मंजूषा कुलकर्णी हिचा केवळ चंद्रावरच्या कवितांचा हा काव्यसंग्रह जेव्हा माझ्या हाती आला तेव्हा मला अक्षरश: शीतलदायी अशा आनंदाची प्राप्ती झाली. हजारो कविता जिच्या हातून रचल्या गेल्या अशी ही प्रतिभासंपन्न कवयित्री, चतुरस्त्र लेखिका, उत्तम वक्ता आणि बरीच काही गुणांची खाण, गुणमंजूषाच आहे. ही मुलगी इतकी गोड आहे ना की मी तिच्या या गुणांच्या प्रेमात पडले. तिला मी अनेक वर्षांपासून व्यक्तिश: ओळखते. खरं तर तिच्या अद्वितीयतेची जाणीव मला तिच्या पहिल्या भेटीतच झाली होती. एका कार्यक्रमात मी आणि ती एकत्रित वक्त्या म्हणून होतो आणि तिचं भाषण ऐकून सारं सभागृह आणि मी प्रभावित होऊन गेलो होतो. तिची शब्दफेक, तिच्या आवाजातला गोडवा, तिचं सालस सौंदर्य, तिची विनम्रता, तिचे पांडित्य, ज्ञानाची सखोलता आणि सतत मुखावर विलसणारं एक गोड हास्य... तेव्हापासूनच ही मुलगी माझ्या मनात घर करून बसली आणि मग आम्ही नेहमीच विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने संपर्कात येत गेलो.

मला आणखी एका बाबतीत कौतुक वाटलं ते इतक्या लहान वयात ही मुलगी महाराष्ट्र राज्याची भाषा संचालक म्हणून अतिशय सक्षमपणे कारभार बघत होती. मी विश्वकोशाची अध्यक्ष असताना उमेदीने काम करत होते तशीच ही एक दुर्दम्य इच्छाशक्तीने भारलेली पोर काम करत होती. तिच्यातला सळसळणारा उत्साह, भाषेविषयीची तळमळ, कार्यकुशलता हे सगळं पाहून अचंबित व्हायला होतं. नंतर तर रोज तिच्या कविता हा तिच्या साहित्यवशाचा भाग म्हणून मला वाचायला मिळत गेल्या आणि दररोज मी तिच्या कवितांना प्रतिक्रिया देत गेले. मनात घर करून बसणाऱ्या तिच्या कविता जशा सार्वत्रिक अनुभव देणाऱ्या असतात तशाच त्या विशेष कल्पना, उपमा, भाव सौंदर्याने नटलेल्या असतात. थेट हृदयाला भिडण्याचे सामर्थ्य त्या कवितांमध्ये असते. बरं कौतुक याचं वाटतं की या मुलीच्या

या साहित्यिक व्रतात कधीही खंड पडत नाही. म्हणूनच तिच्याविषयीचा आदरभाव सुद्धा मनात तयार होत गेला.

मग परवा तिचा मला फोन आला की तुमची तब्येत कशी आहे आणि तुमची प्रस्तावना मला हवीच आहे. खरं तर मी आता तब्येतीच्या कारणामुळे फारशा प्रस्तावना कोणाला देत नाही पण मंजूषाला मी नाही म्हणू शकत नव्हते. तिने दिलेल्या या चंद्रावरच्या सर्व कविता वाचताना मन चंद्राच्या आल्हादतेने भरून गेलं. हळुवार होत गेलं. भारताने चांद्रयानाच्या माध्यमातून चंद्राच्या दक्षिण भागावर काहीच महिन्यांपूर्वी पाऊल टाकलं पण मंजूषाच्या या कविता माणसाला क्षणोक्षणी चंद्रावरती पाऊल टाकायला भाग पडतात. थांबू दे या चांदव्याला असं म्हणत चंद्राआडचं आभाळ ही कवयित्री दाखवते आणि चंद्राच्या अस्तित्वानेच प्रेम भावनेला आलेलं उधाण तिच्या कवितांमध्ये अत्यंत सहजतेने शब्दबद्ध झालेलं दिसतं.

कधी कवयित्रीला चांदव्याचं झाड दिसतं तर तिला कधी तो सखा वाटतो. कधी चंद्र मनातून जागा आहे असं जाणवतं. ही कवयित्री शरद ऋतूच्या कोजागिरी पौर्णिमेच्या चंद्राला पाहून भावसौंदर्याच्या चांदण्यात चिंब न्हाऊन निघते.

मन चांदवा होताना अमृतात डुंबणाऱ्या कवयित्रीच्या मनाचं भावुक मन चंद्रमुखी कुमुदिनी प्रमाणे उमलून येतं आणि आपण या चंद्राच्या माधुरीमध्ये इतके बुडून जातो की प्रत्येक कविता म्हणजे गोडव्याचा अभिनव नमुना ठरावा. मंजूषाचे मराठी, संस्कृत आणि हिंदी या तीनही भाषेतील लिखाण पाहून कोणालाही अभिमान वाटावा असंच या मुलीचं कर्तृत्व आहे. ती मला आई म्हणते आणि मी तिला मुलगी, त्यामुळे मला या लेकीचा सार्थ अभिमान वाटतो. इतक्या लहान वयात तिची शंभरहून अधिक पुस्तकं रचली जातात, प्रकाशित होतायत हे पाहून साहित्य क्षेत्रातील उत्तुंग कामगिरीचा अंदाज यावा.


निव्वळ एखाद्या विषयाला वाहिलेल्या कवितांचे काव्यसंग्रह ही कल्पना अभिनव असून तिला मी त्यासाठी आशीर्वाद देते आणि डॉ. मंजूषा म्हणजे साहित्याकाशातील हा एक झगमगता चांदवाच आहे एवढंच म्हणते.

**– डॉ. विजया वाड**

लेखिका, बाल साहित्यिका आणि माजी अध्यक्षा मराठी विश्वकोष मंडळ

# अनुक्रमणिका


१) गगनी शशीही थिजला ... ९
२) हा चंद्र अमृताचा ... १०
३) हे प्रेम ते न सखया ... १२
४) होत काजवा जीवनी ... १३
५) कवडसा ... १४
६) पाकळी पाकळी अशी मोहिनी ... १५
७) चित्रस्वर हे रंगती ... १६
८) हासलेले मोती वेच ... १७
९) चंद्राआडचं आभाळ ... १८
१०) अशी कांती तेजाळली ... १९
११) थांबू दे या चांदव्याला ... २०
१२) बाहुपाशी ये जराशी ... २१
१३) वाढत जाईल गोडी अमृता ... २२
१४) स्मृती देखण्या या ... २३
१५) चांदव्याच्या सौंदर्याला मन उधाण भेटते ... २४
१६) चेहरा की भाग्य माझे ... २५
१७) सर थेंब मोतीयाची ... २६
१८) तू चंद्राची गं कोर ... २७
१९) चांदणशर्वरी ... २८
२०) दारात चांदण्या गं ... २९
२१) सोहळा रंग क्षणांचा ... ३०
२२) सरले मळभ सारे ... ३१
२३) असे सूर जुळले काही ... ३२
२४) भावकमल उमलते ... ३३
२५) पूर्ण चंद्र तो पुनवेचा ... ३४
२६) मन चांदवा होताना ... ३५
२७) चांदणधागे विणू चांदणे ... ३६
२८) चंद्र उतू जाताना ... ३७
२९) सारे कासार शोभते ... ३८
३०) चांदणं ... ३९
३१) चांदव्याचे झाड ... ४०
३२) चांदणीची कहाणी ... ४१
३३) तुला निरखून पाहू दे ... ४२
३४) चांद सख्या रे ... ४३
३५) तेज भारत हा जाण ... ४४
३६) चंद्र मनातून जागा आहे ... ४५
३७) शरदाची पुनव ही ... ४६
३८) प्रिये शरद पौर्णिमा ... ४७
३९) कोजागिरीच्या शारद राती ... ४८
४०) होत जाय तू प्रकाश ... ४९
४१) नको चांदव्या तू उजळू... ५०
४२) नीज नीज माझ्या बाळा... ... ५१



## (१)
## गगनी शशीही थिजला

येतेस सांग केंव्हा
भेटावयास मजला
मी थांबविले तर हा
गगनी शशीही थिजला

एवढेच मी वदलो
जणू रोहिणीच ती दिसते
माझी प्रिया बहुतसी
तेजचांदणीपरी हसते

पटकन बघून मजला
म्हणे बोलवून घे तिजला
पाहीन ती सखी तव
प्रियरोहिणीही संगतीला

अंतराळी आमुची ही
जोडी खुलून येते
पाहू दे आज मजला
वसुंधरा का भुलते

भेटून जा प्रिये तू
मनी चांदवा खोळंबे
आकाशी एक वेडा
एक चंद्र येथे विलंबे

दि.१९/०९/२०२०
रात्री १०.३८ वाजता



## (२)
## हा चंद्र अमृताचा

पहाटे भल्या उगवला
हा चंद्र अमृताचा
कोजागिरीच्या साठी
निधी होत औषधींचा

जेथून जन्म त्याचा
त्या सागरास भेटे
एकांत शांतवेळी
सांगे मनातले ते

जी लक्ष्मीही निघाली
तव मंथनी कृपेने
मी आज तिजसवे हा
धरणीस सौख्य देणे

करती प्रतीक्षा सारे
हे वैद्यराज माझी
येताच पौर्णिमा ही
सिद्धीस औषधी की

रात्रीस मेळे भरती
गप्पा नि गोष्टी रंगी
तेंव्हा कुठे उसंत
भेटेल मजसी संगी

म्हटले उठून यावे
हे सागरा पहाटे
तू जन्मदाता आमुचा
भरती तुलाही येते

अश्विन हा मास ऐसा
ऋतू शारदीय शीतल
खुश मी अशात खूपच
सागर, गगन नि भूतल

देईन आज सारे
माझे म्हणून जे जे
शीतल चांदणे अन
अमृत पाझरावे

कोणी युगुल प्रेमी
माझ्याच आज साक्षी
जीवास गुंतताना
डोळ्यात चांदपक्षी

साऱ्या वनस्पतीही
होतील पुष्ट आज
संवत्सराने एका
हे दान मिळते त्यांस

मी भेटतो तुला रे
रश्मींच्या या करांनी
भरते उरात तुझिया
हे बिंब साठवांनी

येते उधाण तुजला
पहाटेस अमृताचे
कोजागिरी करू या
नाते युगायुगांचे

दि.३०/१०/२०२०
सकाळी ९.५३ वा.



## (३)
## हे प्रेम ते न सखया

हे प्रेम ते न सखया
स्पर्शतुनी फुलावे
हे आत खोल खोल
मनोभूमीतुनी रुजावे

ही वाट पाहणे नि
ऐसी प्रतीक्षा आहे
जेथे तो काळ वेडा
वेडावलाच आहे

हे प्रेम देणेघेणे
ठरले असावे स्वर्गी
दैवी कृपाच दोघा
घेऊन जवळ आली

मी जागवीन रात्री
हा चंद्रही नभात
तो पाहतो न प्रीत
होण्या सखा सुखात

हे प्रेम शब्द काया
त्यांच्याही पैलतीरी
डोळ्यात स्वप्न माझे
सुरभित ऐलतीरी

ही प्रेमधारा वाहे
नित नित्य जीवनात
मी मांडते सुखांना
घर देत या मनात

घेईन तुजसी जवळी
कोण्या अशाच वेळी
ती रात्र धुंद होता
गात्रात चांदणेली

दि.२४/०१/२१
रात्री १२.४२ वा.



## (४)
## होत काजवा जीवनी

रानावनात पेटलं
लख्ख काजव्यांचं दिवं
माझं सपान सजलं
लुकलूक ते पहावं

रान झालं की जीवन
राती भयाण अंधार
आस गडद काळोखी
तेज चमकतं फार

सुर्व्या दिसाचा सोबती
काय अमावस राती
चांदवा ह्यो तवा गुल
कुठं चांदण्या बी जाती

कुट्ट काळ्या अंधारात
कित्ती भयाण ही भीती
काहिबाही मनी येता
उरी धडधड व्हती


उडं थवा काजव्यांचा
टिमटिमत्या पणत्या
इवला इवलासा जीव
तेजशलाका कोणत्या

कित्ती आधार वाटतो
काजव्यांचा तुम्हा सांगू
ऱ्हाय एकली रानात
भीती झाडावर टांगू

जवा होतोया अंधार
काळाकुट्ट भवताली
सजना रं तुझ्यासाठी
म्या... काजव्यांची साडी ल्याली

तुझ्या नशिबाला म्या ही
देत राहीन उजेड
होत काजवा जीवनी
तुझ्या काळज्या बिमोड

दि.१२/०४/२१
दुपारी १२.२३ वा.




## (५)
## कवडसा

घरे बंद ही छतेही बंद
सिमेंटची पक्की पाबंद
जरा इवलुसा असा झरोका
नाही येईल कुठून कवडसा

ते छत होते मैत्रीपूर्ण
काट्याकुट्यांचे लाकडी जीर्ण
तरी त्यातुनी रोज सकाळी
डोकवून जातसंत ती किरणं

अशा प्रकाशा दोरीसंगे
लटकून गेले रम्य बालपण
धुळीकणांना पकडत होतो
लहान मोठे सारे आपण

अंधाराच्या छाताडावर
नाचून जाई रोज कवडसा
त्याच्या येण्यासवे आशेचा
एक किरणंही सापडलेला

खेळ चालले भू सूर्याचे
तो येई फट छोटी सांधून
घर साधे अन मनही मोकळे
गेले आता मनही बांधून

आता न येतो सूर्य अंगणी
घरात त्याला प्रवेश नाही
नाही किरणे तेजंही नाही
कुठे कवडसे गेले पाही

चला घरांना आणि छतांना
ठेऊ मोकळे थोड्या सांदी
मनास करूया पुन्हा खुले अन
लुटून घ्यावी कवडसी चांदणी

पुन्हा मोजूया कण धुळीचे
मनास करूया स्वच्छ चांगले
पुन्हा जगाया सोडू मोकळे
पहा कवडशा झुले बांधले

दि.१९/०४/२१
दुपारी १२.४५ वा.



## (६)
## पाकळी पाकळी अशी मोहिनी

मोगरी फुलराण्या फुलून आल्या
हासल्या हासल्या गाली
जवळ काही कळ्यांनी त्यांना
विचारले गुज कानी

का गं एवढ्या प्रसन्न तुम्ही
गंध गेला दूर वनी
आलंय कोण भाळून दोन
फुलपाखरं की रानी

कोणीतरी सखीवेडा ही आला
गजऱ्यासाठी घेऊन गेला
संन्यासी कोणी भक्तीची गाणी
गाऊन  ठेवा देवासी नेला

कुणी चिमुकली बालिका आली
फुलांना हळुवार स्पर्शून गेली
आई कोणी आली होती दमलेली
मोगरी जवळ रमून गेली

नासिका खरी ऐश्वर्यवती
गंध अलौकिक हुंगत राहती
ती या सुरभीस मनी पाठवी
ऋतूविनाही मोगरीला आठवी

फुलू दे अंगणी मोगर आंदणी
चंद्र दिलाचा घोंगवे रिंगणी
पाकळी पाकळी अशी मोहिनी
पुनवेची तीत रोज चांदणी

दि.१८/०४/२१
रात्री १२.०१ वा



## (७)
## चित्रस्वर हे रंगती

भास हे आभास सुंदर
सावल्यांच्या बंदिशी
तो अडकतो दिनमणीही
स्वेच्छेने जणू त्या निशी

संध्यासमयी परत निघता
कोणी वाजवली गिटार
छेडिली अन काळजाची
कोणी प्रीतीने ही तार

हाती ना येतो कधी हा
दिड मणी सदा व्यस्तसा
आज झाला बंदीवासी
समय जरी तो अस्ताचा

वृक्षराजी जलतीरावर
सावल्यांची सोबत
झडती सप्तही सूर येथे
संध्याकालीन नौबत

क्षितिजंही उतरून आले
मध्यभागी मैफिल
सूर्य अतिथी या सभेचा
कोणी नाही गाफिल

ऐकुनी ते गाण सुंदर
रेंगाळे थोडी निशा
चांदवाही थबकला की
विसरला स्थाना दिशा

जलतरंगांनी दिलेली
साथ सोबत एरवी
छान झाली सांगताही
सूर्य गायी भैरवी

जादू ही संगीत ऐशी
सारे विसरून दंगती
अन निसर्गातून दिगंती
चित्रस्वर हे रंगती

दि.२०/०४/२१
सकाळी ०८.१४ वा.




## (८)
## हासलेले मोती वेच

अस्सं अंगण अंगण
मन घालतं रिंगण
ऋतू ओघळत येती
त्यांचं चैतन्य सांगणं

सारी हिरवाई नांदं
पाचू भरलेलं झाड
हिरवा चुडाही हातात
शेत हिरवंच ग्वाड

आली नेसून लुगडं
हिरवं इरकल बघ
चोळी अंगावर शोभं
रूप सालस ते तिचं

तिचा वावर घरात
अंगणात खुशी पडं
असं संसाराचं सुख
हाती सोनुली बागडं

छकुलीनं घातलेलं
देख परकर पोलकं
साध्या सुध्या संस्कृतीचं
चित्र कित्ती हे बोलकं

ओसंडून वाहतीया
खुशी मुखड्यावरून
जिथं मायलेकी खुश
घ्यावा आनंद जाणून

हासलेले मोती वेच
कळ्या सुखाच्या अमाप
पायघड्या सृष्टी संग
ये ना अशीच चालंत

असं फुलतं ऱ्हाऊ दे
माझं घर नि अंगण
भर उन्हात पडू दे
माझ्या अंगी हे चांदणं

दि.२२/०४/२१
रात्री ११.४७ वा.



## (९)
## चंद्राआडचं आभाळ

चंद्राआडचं आभाळ व्हायला
मन मोठं लागतं रे
चंद्र झेलून मागे राहणं
सांग कुणाला जमतं रे

स्तुती झाली तर होईल शशीची
आभाळ रिक्त असेच ना
तेजाला त्याच्या सांभाळूनही
आभाळ अंधार लेतेच ना

चंद्र आला की गोळा चांदण्या
एरवी कोणी फिरके ना
काळ ढकलावा म्हटलं तरीही
कृष्णपक्ष हा सरके ना

ती भयानक रात्र काळोखी
अमावस्याही परकी ना
आभाळाला दोन्ही सारख्या
पूनम अथवा अमावस्या

ते एकाकी जगणे अवघड
एकटेच ढग पोसणे ना
चंद्र तारे पाऊस इंद्रधनू
सगळे इतरांस्तव असणे ना

हसले तर ते पडे चांदणे
काळोखाने कृष्ण निळा
गप्प बसे तर घुम्म आभाळ नि
गर्जत असता घन बावळा

स्वच्छ दिसे तर पिंजला कापूस
गरजे तर मग बरसेल काय
पाऊस पाडून पाहतो तेंव्हा
श्रेय मृगाला वर्षी जाय

चंद्राआडचं आभाळ होणं
आधार केवळ बनून ऱ्हाय
कधी ना नशिबी कौतुक येईल
खापर फुटलं जाईल पहाय

चंद्राआडचं आभाळ हसरं
दुःख कुणाला समजे ना
असून नसून कुणी ना आपुले
जखम कुणाला उमजे ना

चंद्राआडचं आभाळ होणं
धुमसून गुपचूप रडणं फार
सुखास थारा नाही कधीही
दुःख बोचरे, अति धारधार

दि.२९/०४/२१
सायं ०५.२१ वा.



## (१०)
## अशी कांती तेजाळली

गेला बुडून डुबून
सायंकाळच्या प्रहरी
क्षितिजाशी रेंगाळली
केशराची छटा न्यारी

जाता जातानाही देतो
रविराज दृष्टिसुख
वर निशापती आला
भागे चांदण्याची भूक

एक तेज तळपते
एक आल्हाद लेऊन
दिन प्रकाशित करी
एक रात जागवून

एक येतो उठवत
एक झोपण्यास सांगे
दोघे चालवती रथ
सृष्टी रंगातून दंगे

एक मावळतो तरी
मनी उगवत राही
एक उगवतो जरी
शीण जाय मावळती

नभी सौभाग्याचा टिळा
केशराचा गंधमळा
निशी सजून धजून
चांद रुपेरी बावळा

जीव त्याच्यातंही आहे
जीव याच्याही भवती
जिथं तेज शीतलता
थोडं थांबू की सांगाती

राहे आदित्य हृदयी
चंद्र मनातून वाहे
एक दिवसाचे स्वप्नं
एक रातीस रमवे

अशी कांती तेजाळली
दिशा कशी उजळली
औक्षवण करते ही
तेज किरण अवळी

दि.२५/०४/२१
रात्री ०८.०३ वा.



## (११)
## थांबू दे या चांदव्याला

चंद्र तेजाळून आला
पाहता तुज कांतीला
थांबवी रेंगाळुनी तो
त्याच्या नियत भ्रमंतीला

चेहरा की मूर्त रेखीव
देखणे लावण्य ऐसे
गोडवा सांडे तयावर
माधुरी मी वेचणे

टिपता मी गे चुम्बनांनी
चंद्र हा हाती लाभला
लाजुनी तू वळविता मुख
चंद्रही तो सुखावला

तो तिथून कर लांबवून बघ
किरणे टाकून बांधतो
ही लजाकत ही नजाकत
रोहिणीला सांगतो

प्रेम देई चांदण्याने
रंग सोनेरी असा
तो तुझ्या कांतीत वेडा
डुंबूनी गेला जसा


ती फुलांनी लगडलेली
डहाळी पडदा देखणा
डोकवी बघ चंद्र राजस
रूप न्याहाळून पाहण्या

आडपडदा त्याचा तुजला
नाही वाटत ना सखे
मी तुझा हा प्रेमकैदी
दूर का करीशी असे

चंद्र डुख धरी मजवरी हा
बाहुपाशी धरिता तुजला
ओशाळून तो समजतो की
भाग्यशाली प्रियवर मजला

थांबू दे या चांदव्याला
तू भराला ये प्रिये
न्हाऊ दे मज प्रेमरंगी
पाहू दे सुख चंद्र गे

दि.२९/०४/२१
रात्री १०.२३ वा.




## (१२)
## बाहुपाशी ये जराशी

बाहुपाशी ये जराशी
घट्ट बिलगून जा मला
चांदणीला कवेत घेऊन
चंद्र होऊ दे मला

अंग चोरून लाजलाजून
झाली तनु नाजूक कळी
वाटते जणू जाईजुईला
घेतले मी ओंजळी

घातला वेढा करांनी
तूच तुझिया भोवती
कोंदणी त्या ठेव ठेवीशी
लज्जा शीला राखशी

एरवी जे खोड्या करती
ते नयन झुकले बळे
बंद डोळ्यातून मजला
दिसती स्वप्नं सोहळे

तव भ्रूकुटी लीला करुनी
करती मज घायाळ ज्या
आज अगदी शांत चित्री
रेखाव्या असती अशा

ओष्ठ दोन्ही बोलके जे
बंद  थरथरती उगा
अमृताचे पान करण्या
आतुर मी गे केवढा

ती हनु गोल सुंदरी
केवढी झुकली खाली
या करांनी उचलुनी तिज
चरम सुख मज शृंगारी

शब्देविण रस बोलती
आनंदभाषा सुंदरी
ही मिठी ही रात्र पूनम
राहू दे  सदा अंतरी

दि.२९/०४/२१
रात्री ११.४८ वा.



## (१३)
## वाढत जाईल गोडी अमृता

मी उभी विरहिणी भेट उन्मनी
किती दिसांनी नटुनी थटुनी
दर्पणात निरखून रूपाला
वाट पाहते साजन सजनी

एक लावला दिवा तेवतो
तुझ्या नि माझ्या प्रीतीसाठी
आरशात तो स्वप्नं दाखवी
गढून मजला जाण्यासाठी

तूच दिलेली नेसून झाली
साडी केशरी लाल सुंदरी
हिरव्या काठांवरती नक्षी
तिच्यात अडकून चंद्र अंबरी

चालत नाही तोही अडखळे
उत्सुक पाहण्या अवखळ चाळे
तुझ्या नि माझ्या अनुरागाचे
त्याच्या भोवती तेज खळाळे

चंद्र पाहता उधाण येते
नजर केवढी मधाळ होते
आजही आकाशात तो आहे
तू झडकरी ये ...मी वितळून जाते

मला पाहते की तुलाच मी तर
जरी चेहरा माझा वरवर
दर्पणात ते तुझेच बिंब
देहामध्ये लाडिक थरथर

ये ये अवचित येई राजसा
बिलगून घेण्या मधुचंद्रिका
लज्जा वाचून घेशील अलगद
वाढत जाईल गोडी अमृता

दि.२०/५/२१
रात्री ११.५२ वा.




## (१४)
## स्मृती देखण्या या

येशील चांदव्या रे
मेघात तू लपुनी
पाहशील हळूच ऐसे
प्रेमाने झाकाळुनी

तुला पाहण्याला
ही जागीच झाडे
फुलांचे हे गुच्छ
हाती ताजेतवाणे

खिडकीत माझी
प्रिया एकली ही
निरखंत तुजला
अशी थांबलेली

शीतल तुझी ही
किरणे दिलासी
तुझ्या चांदण्यातील
या रात्री विलासी

तुला पाहुनी मीही
व्याकुळ होतो
प्रियाभेटीला
खेचखेचून जातो

अशा मीलनाच्या
स्मृती देखण्या या
पुनव चांदण्यावर
पुन्हा रेखण्या ह्या

दि.२२/०५/२१
रात्री ११.४६ वा.



## (१५)
## चांदव्याच्या सौंदर्याला मन उधाण भेटते

लागे ग्रहण तरीही किती मोहक सुंदर
खळाळती लाटा अन उधाणला समुंदर
तेज झाकोळतं जरी अवचित काही काळ
पुन्हा तुझ्या चांदण्याची बरसात ही सुकाळ

तूही माखलेला असा माखतोस आम्हालाही
तुझ्या राज्यातून होई  हद्दपार काहिलीही
तुझ्यातच चांदण्या नि रोहिणीही गढलेली
तुला पाहताच प्रीत कासाविशी वाढलेली

उतू जातोस तू असा चांदण्याच्या अमृताने
उतावीळ मन इथं राजसाच्या आठवाने
तीर मारतो मदन रती घायाळ इथली
तुझ्या सहवासी मज स्वप्नं चंदेरी लाभली

पुनवेची रात अशी सरू नये ती कधीच
किती बोलके आकाश आज गुंगले उगीच
सुंदराला शाप तरी तसूभर ना घटते
चांदव्याच्या सौंदर्याला मन उधाण भेटते

दि.२६/०५/२१
रात्री १०.५७ वा.



## (१६)
## चेहरा की भाग्य माझे

बोलक्या दो नयनांच्या गे
तेवणाऱ्या निरांजनी
त्या प्रकाशी तेजाळतो मी
जरी सावळा ग साजनी

भाव दडती लाखाचे ते
पापण्यांच्या कोंदणी
मिटतो मीही नयन मिटता
प्रियतमे तव लोचनी

कृष्ण भुवयांच्या कमानी
राखणीला सारख्या
त्या तुझ्या लोभस अदांना
नसती कधीही पारख्या

चंद्रालाही केले बंदी
माथी तू त्या सजविले
नथनी म्हणुनी त्यास तू तर
नासिकेवर टांगले

ओष्ठरागाने खुलाव्या
पाकळ्या अधरांतुनी
रंग घेती तेच तुझिया
अमृताच्या रांजणी

चेहरा की भाग्य माझे
दर्पणी मी पाहतो
त्या तुझ्या मुखकांतीवरती
विरघळुनी मी वाहतो

बांध आता बांध की मज
सोड तू प्रिये मुक्तसा
जीवनाचे ध्येय सुंदर
पूर्ण झालो मी असा

दि.११/०६/२१
रात्री ११.०३ वा.



## (१७)
## सर थेंब मोतीयाची

थेंब ओघळून आले
जरा विसावण्या इथं
झडलेली पालवी न
झाड ओसाड वाकलं

त्याचं दुःख कुणा कळे
पानगळल्या जखमा
तनु शृंगारली कधी
आता उरलेल्या खुणा


आल्या सवयीनं सरी
खुली झाडाची ओसरी
जरा भकास उदास
त्याच्या पानोपानी चरी

मग रूप मोतीयचे
थेंब थेंब पांघरून
झाड लगडून गेले
थेंब थांबून रमून

एक इटुकले पान
ऋतू मागचा लेऊन
नव्या चांदण्यांच्या नभी
गेले चिंब ओलावून

सर पाण्याची पाण्याची
सर थेंब मोतीयाची
सरसर सुख आले
बरसात चांदण्यांची

दि.२५/०६/२१
रात्री १०.४९ वा.



## (१८)
## तू चंद्राची गं कोर

तू चंद्राची गं कोर
माझी चित्त चकोर
माधुर्य वाटणारी तू
शीतल मुग्धा मृदुशार

वाकून पाहतेस जेव्हा
मनात माझ्या बसतेस
अदा तुझी वेगळी
मज तुझाच करून राहतेस

तुझ्या सात्विक सौंदर्याचे
चांदणे जाते पसरून
मग चांदणराती मजला
आकाशातून विहरून

ते हास्य तुझे दबलेले
मर्यादेने थांबलेले
डोळ्यात प्रतीक्षाक्षण गं
ना कधीच सांगितलेले

तू अबोल तरीही बोलकी
मज शब्दवाचून सांगती
नजर इशारे सारे सारे
प्रेम खरे ते मागती

तुझी छबी कोरूनी ठेवली
मनपटलावर कायमची
तू ये माझ्या जीवनी
मज मिळेल शक्ती जगण्याची

दि.२१/७/१९
दुपारी १.०१ वा



## (१९)
## चांदणशर्वरी

चांदणशर्वरी
शीतकिरणे भूवरी
रम्य सरसतीरी
राधेसंग गिरीधारी

स्वच्छ शुभ्र नभांगण
आलं भराला चांदणं
नीलरंगी आकाशानं
राधारंग पांघरणं

सरोवर ते प्रसन्न
कुमुदिनी मोदमन
चंद्र पाही नभातून
तुझं माझं रे भेटणं

आली श्वेतहंस जोडी
जीवा शिवाची सांगडी
तुझ्यासवे मज गोडी
निरखती वेळा अजोडी

आज आपण वेगळे
असू जरी नेहमीचे
मांडीवर करा टेकू
तुझ्या पुढे राधा बसे

तुही हळुवार माझ्या
केशकुंतली रमला
सोनफुला माळताना
आरसाही ओशाळला

पाहण्यास दर्पणात
छवी गुंग तुझी माझी
मला दिसेनाच मी की
दिसे सावळा श्रीहरी

रूप तुझे निरखते
मजला मी विसरते
प्रेम असे हे कसे रे
जगताला मोहवते

विश्वाचा पोषक तू
राधा क्षुल्लक जीवजन्तु
कसे प्राण गुंतले रे
तुझे माझ्या हृदयातु

राधा राधेची कधी ना
प्रेमभक्ती ही तुझी ना
अंतरीच्या दर्पणात
राधाश्याम एक हो ना

दि.२६/७/१९
सकाळी ८.१५ वा



## (२०)
## दारात चांदण्या गं

दारात चांदण्या गं
लखडल्या वेलीला
फुलण्याची रोज घाई
कोवळ्या त्या कळीला

दार सुगंधले
मन भारावले
परडीत रोज माझ्या
गंध सामावले

देव्हारा दरवळे
रोज त्या सुगंधाने
परिमळ भक्तीचा की
चित्त उमाळून जाणे

सौरभ या फुलांचा
मार्गही थबकतो
थोडा विसावून येथे
गंध भारून चालतो

वाटसरू माझ्या दारी
रेंगाळतात थोडे
दोन फुले तोडतात
नेती संगती गोड कोडे

माझी लेकुरे सख्यांना
दावतात चांदणफुला
तोडण्या बालगोपाल
करती कृष्णलीला

साजन माझा येतो
तिन्ही सांजेला घरात
त्या वेलीसवे मीही
सुगंधाने भरात

जाई जाई अंगणात
साजणी त्या मनात
दारी थांबते सजून
जाईसंगे मी लाजून

तो जाईला पाहतो
मी त्याच्या मोहराला
जाई फुलता परिमळ
आमुच्या संसाराला

ये गं ये गं फुलूनिया
जाई माझ्या तू अंतरी
सुख चांदणं लगडे
अंगणी घरी दारी

दि ४/९/१९
सकाळी ८.४७ वा.



## (२१)
## सोहळा रंग क्षणांचा

ही चंद्राची कोर उगवली
देत सुखाचे चांदणे
जमेल तैसे तेजा द्यावे
नक्षत्रांचे सांगणे

कधी कुणाचे स्वप्नं सांगते
चंद्राशी जोडून
ती नभाची राणी खुदकन
हसते ढगा आडून

शांत निवांतशा वेळी मग हे
खळे खुलुनी येते
निळ्या मंदशा सुख प्रकाशा
निशा भुलूनी जाते

राजस येतो हळूच जवळी
चंद्र मोहवीत जातो
मुखचंद्राच्या डोहामध्ये
मना गुंतवीत रहातो

असे वाटते भरतो चांदण्यांचा
लाडिक सुंदर मेळा
अन विरघळुनी जाती राजा
माझ्या लाघववेळा

आकाशातून शृंगाराच्या
अदा किती चालल्या
तशातच तू कळ्या मोगरी
मज कुंतली माळल्या

सरू नको ग रहा थबकुनी
रजनी तू मजसवे
त्याच्या खोड्या रोज वेगळ्या
छंद प्रियवरा नवे

गगनालाही गंध मोहवी
इथल्या कळ्याफुलांचा
म्हणून क्षितिजावरती झुकता
सोहळा रंग क्षणांचा
सोहळा रंग क्षणांचा

दि.२२/०२/२०२२
सकाळी ११.५४ वा.

## (२२)
## सरले मळभ सारे

सरले मळभ सारे
आभाळ मोकळे झालेऽऽ
मन सापडेना मजला
कोठे गहाळ झालेऽऽ

त्याला सवय दुःखाची
पसाऱ्यात रमणारे ते
स्वच्छ मोकळा श्वास
ना झेपणारे त्या ते


सावर मना सावर रे
हे सुखद चांदणे आहे
तुज रात्र काळोखी ठाऊक
परि तेज नव्याने पाहे

मज आत हुंदके देऊन
तू थकला असशील वेड्या
त्या दुःखाच्या तुजपायी
माझ्यासम असतील बेड्या

चल तुटले साखळदंड
नवमार्ग खुलुनीया आले
चमचमत्या चांदण्यांनी
आकाश भरुनी गेले

भोगले जे सारे सारे
ती रात्र अमावस होती
बघ पूर्ण चंद्रमा आला
आपसुक तुझिया हाती

दि.०५/०३/२०२२
सकाळी ११.५५ वा.



## (२३)
## असे सूर जुळले काही

असे सूर जुळले काही
मंद चांदण्यात
रात्र थिजली आहे अजुनी
इथे अंगणात

तारा जुळल्या रम्य सुंदर
छेड अंतरंगी
क्षणोक्षणी सहवासाचा
मोह तो सुगंधी

कधी शब्द गीत होती
कधी मूक भाषा
तुझ्या माझ्या प्रीतरंगी
नाहलेल्या दिशा

देण दैवी असती नाती
जुळती स्वर्गकोशी
त्याच कृपेमुळे सजनी
आज माझी होशी

भाव पोचले ते ह्रदयी
साद ऐकू येई
सूर जुळले जे मनीचे
नाद मुग्ध होई

दि.२३/०७ २०२२
सकाळी १०.४३ वा.



## (२४)
## भावकमल उमलते

स्पर्श तुझा रे हवा फुलांना की
स्पर्श तुला रे फुलांचा
असे चांदणे उधळीत येशी
चांद उजळ पुनवेचा

ते तुझे सदा भरणे शीतल
प्रकाश अन तेजाने
पुन्हा लुप्त होऊन कितीदा
नभी गडपही होणे


वाट पाहते रमणी कोणी
कुणी प्रियेची प्रियवर
जीव टांगणी लागून जातो
ढगात अडतो तू वर

किती दूर तू किती जवळ रे
कसले आपुले नाते
तुला पाहता मना उभारी
भावकमल उमलते

उगाच छळसी बसून गगनी
तळमळणारे प्रियतम
शिकून घेशील भेटवण्याची
कला तू पटकन प्रियजन

होतील अनंत उपकरही हे
तुझे रसिक या दिलावर
काव्यप्रीतविरहाचा विषय तू
तुजविण रात जिवावर

दि.०६/०६/२०२२
सकाळी ०८.१३ वा.



## (२५)
## पूर्ण चंद्र तो पुनवेचा

तो दिसला मुखचंद्र अधुरा
बेचैऽऽन झालो मी
आऽऽजही त्या चेहऱ्यावरी
खिळून राहिलो मी

ते सुंदरसे नयन बोलके
नजर भेदणारी
शब्देविणही सारे काही
उलगडून सांगणारी

त्या भुवयांच्या मस्त कमानी
कधीच रमलो मी
ती गेली तरी अजून त्या क्षणी
असाच गमलो मी

ती सरळ नासिका सुंदर कलिका
त्यावर नथनी सजली
अधीर जाहल्या जिवास जणू
तडपवणारी ती बिजली

गंध सुगंधही तिजवर भाळून
वाऱ्यावर पसरला
झुळूक मारव्याची होताना
वाहणेच विसरला

ती टिकली जी गोल गोल जणू
तिच्या कपाळी बसली
मोहक चांदणी जणू नभीची
भाळावरती हसली

लोलक सुंदर कर्णफुले डुल
अंतरंग होऊन
मन माझे झुलते हो त्यावर
असे फिदा होऊन

त्या ओठांच्या नरम पाकळ्या
फुलाफुलांना लाजवती
हुकुमत आपुली मज चित्तावर
पदोपदी नित गाजवती

असे वाटते पुन्हा दिसावा
पूर्ण चंद्र तो पुनवेचा
मी होऊन शशिकांत रमावा
प्रीत चांदणी सखा तिचा

दि.०९/०५/२०२२
सायं ०६.२७ वा.



## (२६)
## मन चांदवा होताना

तारकांच्या पडद्यात
तुझे ठळक हसणे
चेतवून भावनांना
साळसूद ते असणे

चांदव्या रे तुला कसे
सांग उधाण कळावे
सागराने ओढीपोटी
रूप भरतीचे घ्यावे

लता वेली नि झाडांनी
तुझ्या चांदण्यात न्हावे
दूर नभातून तुही
उतावीळ रान पहावे


आज सेज सजलेली
मन चांदवा होताना
आकाशात चांदवेली
कळ्या चांदण्या देताना

मेघ ओथंबून आले
दव पानोपानी पहा
तुझ्या माझ्या नात्यासाठी
थांबलेली रात अहा

आस मीलनाची तूच
तूच विरहात जाळ
तूच पुनवेला तेज
देत रातभर चाल

दिस ढकलते मीही
निशा पांघरून घेते
आत गुज तुझे माझे
कसे शहारून येते

दि.०१/०६/२०२२
रात्री.०८.२४ वा.



## (२७)
## चांदणधागे विणू चांदणे

किरण शलाका खाली सांडल्या
चांदण्यातल्या रात्री गुंगल्या
जळही झाले दुधाळ सारे
मनी कल्पना धुंद रंगल्या

चंद्र वाहतो पघळून जाऊन
नदी चांदण्याची ही होते
मस्त कोसळून जाती धबधबे
हृदयी कामना जागी होते

जळात सोडून पाय बसावे
प्रियवरा संगती तुझ्या असावे
शांत सुवनी या चांदणे प्यावे
रम्यतेस साठवूनी घ्यावे

खळे केवढे त्याच्या भवती
ओथंबून चांदण्याही जाती
लज्जा होते तरल पांढरी
पारदर्शिता लेत्ये प्रीती

गगनी चांदणे मनी चांदणे
वनी चांदणे तनी चांदणे
चांदणधागे विणू चांदणे
आल्हादाचे भांडार चांदणे

दि.०९/०९/२०२२
रात्री ०९.१८ वा.



## (२८)
## चंद्र उतू जाताना

चारू चंद्रमा तुझी लालिमा
आज खुलुनी येते
को जागर्ति विचारते ही
लक्ष्मी रात्रीला फिरते

आज सुधाघट चंद्र बरसवी
नभी  मोहवत राही
अशी मोहिनी या जगतावर
शरद पौर्णिमा पाही

आरोग्याचा मंत्र जागरण
कोजागिरीच्या राती
शशी किरणांच्या मंडपातली
खुली खुलणारी नाती

अशी कळावी प्रीत मृदुलशी
मन हळवे असताना
हात प्रिया तुज हाती असावा
चांदण्यात बसताना

उधाण येते मज हृदयाला
चंद्र उतू जाताना
तुला पाहते हळुवार मी
सुधांशु मम होताना

रात्री १०.३५ वा.
कोजागिरीच्या हार्दिक शुभेच्छा
१९/१२, २१:०८



## (२९)
## सारे कासार शोभते

फुललेल्या कासारात
हसणारी ही कमळे
कळ्या डोलून वाऱ्याशी
गुज कानाशी चालले

चंद्र चांदणे शिंपडे
रंग दुधाळी पसरे
नभ अलगद वेडे
तळ्यामध्ये का घसरे

पानोपानी चित्रकारे
रेखवून द्यावी कला
तरंगत हिरव्याशा
पटली हवा चंचला

सांज देखणी लाजते
निशा सुंदरी गाजते
कुठूनसे सूर नवे
गीत नवेच वाजते

रात जागते जागते
सारे कासार शोभते
किती सुंदरशी शांती
इथे लाभते लाभते

दि.१८/०७/२०२३
सकाळी ०८.१३ वा.



## (३०)
## चांदणं

चांदणं
शरदात हसणारं
भूल भूल भुलवणारं
मस्त धुंदीत मनास खुलवणारं

चांदणं
कोणासाठी पडलेलं?
प्रत्येकाच्या उधाण अंतर्मना
प्रीतीच्या फेसाळणाऱ्या चंचल भावना

चांदणं
त्याची मक्तेदारी
शुभ्र हास्याची उधळण
रात्रीला आठवांना देणारी उजळण

चांदणं
विरहाचा जाळ
रूपानं आल्हादी नितळ
जाळणारं सांगा कसं शीतळ ?

चांदणं
मनाचा दिलासाही
प्रिय प्रियतम वाटणारं
सखा म्हणून नित्यनेमानं भेटणारं

शिरोमणी काव्य
दि.११/१०/२०२२
सकाळी ०८.१३ वा.



## (३१)
## चांदव्याचे झाड

चांदव्याचे झाड उगवून आले आहे
चांदणे त्याला हो लगडून गेले आहे
झोपडी माझी रुप्याची चिंब होते
आणि काळीज बाग सारी धुंद होते

वाटते माझ्या मनाची भूल का ही
पाहते तर जाणवे चाहूल काही
राजसा तव आठवांच्या हिंदोळ्यावर
मी किती झुलते तू राजा आज पाही

यामिनी ही कामिनी मनमोहिनी
बोलते मज गूज सांगे रातराणी
या जळातील लाट लाट जाणणारी
जाळणारी एक एक ही विराणी

वाटते हे झाड ज्वाळा ओकते
कोणत्या प्रियेसाठी एवढे वाकते
दुःख त्याचे जाणते कोणी इथे का
चांदणे विरहात हृदया फेकते

मीलनाची आस जागी होत जाते
शुक्लपक्षी कलेकलेने वाढ होते
ना दिसे प्रियतम तरी मग ओहोटी अन
रात सारी काळोखाची तेज होते

लुप्त होतो चांदवा मन अतरंगी
धुमसुनी रडतो बिचारा काजळांगी
ती अमावस जीवघेणी त्यास वाटे
का दिले देवा फुलासंगे तू काटे

पण पुन्हा हे झाड ऋतुगंधात न्हाते
आल्हादाची केवढी बरसात होते
जगविणे हा वृक्ष बहरा ज्याचे त्याने
प्रेम धागे रेश्माने घट्ट विणणे

दि.१३/०१/२०२३
सकाळी ०९.४३ वा




## (३२)
## चांदणीची कहाणी

अहा डोकावून पाहते कोर तेथे
अजून चांदणी रमली उजेडात येथे

विसरून गेली स्वतःला सुखाने
दे झोकुनी चंद्रकांता मुखाने

गेली बुडूनी रात्रीस जैसी
ते चांदण्याचे क्षण विसरे कैसी

परि ही सकाळ तिज मोहवीते
आणिक गगनात तिज थांबवीते

धवल शिखरे साक्षी तिच्या त्या उधाणी
नभी जळी तरुतळी चांदणीची कहाणी

दि.११/०४/२०२३
सकाळी ०६.४७ वा.



## (३३)
## तुला निरखून पाहू दे

ढगाआड लपलेल्या चांदव्याचा
मिश्किल रुबाब पहा तरी
गालावरची खळी त्याच्या
हसतेय गोड वरचे वरी

चांदण्याला आवरून
घडी करून ठेवलीय त्याने
रात्रीत ढगांच्या आवरणात
आडून आडून नुसते पाहणे

लपाछपीचा खेळ चाललाय
कधी दिसतोय कधी दडतोय
थंड शिरवाईत ढगांच्या कुशीत
मस्त मजेत उडतोय

तुझा खेळ होतोय खरा
जीव इथे प्रियवरांचा अधमरा
भावनांची भरती, भेटीची आस
तुझी साक्ष मनोमनी प्रीत दालनी खास

तुझ्या लपाछपीमुळे
जीव वरखाली होतो
तुझ्या गोडव्यामधे सखीच्या
मधुरतेचा भास होतो

थांब ना क्षणभर
तुला निरखून पाहू दे
सखी कधी येईल माहीत नाही
तुझ्यात मला हरखून जाऊ दे

दि.२८/०४/२०२३
सकाळी ०८.४७ वा.



## (३४)
## चांद सख्या रे

चाळणीतल्या चांद सख्या रे
चाळून सुखा तू देशील का
दुःख हवेतच उडवून देऊन
पदरी सौख्य टाकशील का

तुझ्या तेजाने उजळून जाते
मन हे माझे नित्य नवे
तुला पाहुनी वाटे मजला
आभाळ आपुले एक हवे

त्यात भराव्या लक्ष चांदण्या
सुंदर लुकलूक आनंदी
मेघ भरूनही यावे अलगद
आकांक्षांचे मनबंदी

इथे चांदणे तुझे मिळावे
तिथे तुझ्यावर आस अशी
सखा हा माझा जीवलग मीही
त्याची रोहिणी भास जशी

आज मी धरले व्रत त्यासाठी
तू तेथून बघ हसशील ना
चेहऱ्यात मज दिसू दे झलक की
प्रीत साक्षी तू असशील ना

दि.१४/०६/२०२३
रात्री १०.३२ वा.



## (३५)
## तेज भारत हा जाण

आज उतरले यान
चांदोमामाच्या घरात
किती युगांचे दाटले
स्वप्नं हळवे अंतरात

दिनराती मेहनत
कष्ट फळाला आलेत
आज तिरंगा पाहण्या
देव शहारू गेलेत

देवभूमीतून आला
दूत चांद्रयान झाला
वसुधैव कुटुंबकम्
नाद त्रिखंडी गाजला


दृष्ट काढावी असे हे
सारे शास्त्रज्ञ गोंडस
माय भूमीचा संदेश
गोड प्रज्ञान पाडस

भारताचं पडताच
अलगद हे पाऊल
स्वर्गी पोचली खुशी नि
देवकृपेची चाहूल

चांदव्याचे रूप कसे
समजायचे हो आता
एक पाय धरतीशी
एक शशीवर जाता

देश माझा अभिमान
तेज भारत हा जाण
तीट लावते तुला रे
गुणी तीन चंद्रयान

दि.२३/०८/२०२३
सायं ०६.३४ वा.
चांद्रयान ३ च्या यशस्वी मोहिमेसाठी
सर्व भारतीयांना चांदुल्या शुभेच्छा



## (३६)
## चंद्र मनातून जागा आहे

अजूनही चंद्रावर मन ते
मन चंद्राचे रूप पाहते
उपमांमधल्या राजसरूपा
रूप आगळे इथे राहते

असू दे की तो असला जसाही
युगायुगांचे नाते आहे
रूपावरती नाही सारे
भावनदी ओथंबून वाहे

रेशीमधागे घट्ट असता
वरपांगी रूपाचे काय
धरा चंद्रमा बंधु भगिनी
दाट मायेची साखरसाय

गावी त्याच्या असेल काय
जाणून घेण्या धरणी माय
सपुत भारती संतानाची
विजयी गाथा शिखरी जाय

चंद्र मनातून जागा आहे
चांदण्यातले देत दिलासे
आनंदाने जग स्वीकारील
भारतविक्रम देई खुलासे

दि.२४/०८/२०२३
सकाळी ०८.३७ वा.



## (३७)
## शरदाची पुनव ही

चांदव्याचा खुललाय टपोरा मोती
चांदण्यांच्या पणतीत लाविल्या ज्योती

शरदाची पुनव ही उतू उतू जाय
आकाशाच्या पडद्यात चाललंय काय

रोज राती चाळणीनं चाळा चांदवा
राजसाला मन धाडी प्रीत सांगावा

आपसुक चांदण्यात गुंफत्यात मनं
मोरावानी खुलुनिया डोलत्यात वनं

उफाळून वर येती भावनांची नदी
उसळल्या सागराला माघार ना कधी

लुकलूक चांदण्या ह्या मिटत्यात डोळं
गालावरल्या खळीमंदी लाज काय बोलं

कशासाठी पाठी पाठी रोहिणीच्या शशी
कोजागिरी जागताना जागी प्रीत जशी

मिठीमंदी विरघळू जातीया ही रात
चांदव्याची वरात ही खुशीत जोरात

लाजाळू म्या अलगद मिटणार हाय
चांदण्यात तुझ्या खोड्या जपणार हाय
राजा जपणार हाय...

दि.२५/१०/२०२३
रात्री ११.२७ वा.



## (३८)
## प्रिये शरद पौर्णिमा

पिठुर पिठुर चांदणं
चांदण्यात गुंगणं
गुंगण्यात रंगणं
रात कोजागिरी

तुझ्यासवे चालणं
चालताना बोलणं
वचन गोड पाळणं
सखे साजणी

कोणता बघू प्रिये
चंद्रमा तुझ्यासवे
मुखचंद्र मधुर गोड की
गोड नभी चांदणी

भाग्य मजसी वाटते
तू जी मजला भेटते
मन अधीरता गाठते
कसे सावरू

प्रिये शरद पौर्णिमा
तुज मुखी जी लालिमा
रूपसी मनोरमा
तू  मोहिनी

दि.२८/१०/२०२३
रात्री १०.३१ वा.
कोजागिरी पौर्णिमेच्या शुभेच्छा



## (३९)
## कोजागिरीच्या शारद राती

कोजागिरीच्या शारद राती
शांत चांदण्यात हृदये गाती
वेगळी आभा वेगळ्या छटा
चांदणी खुलून येतात नाती

उगा कुणावरी मन भाळते
का उगा कोणाला व्यर्थ टाळते
पूर्ण चंद्राच्या अमृती न्हाऊन
मनासी भरती तेंव्हा कळते

कुठले कुठले विचार छळती
भाव कसे कोणाला कळती
प्रीत विरही का अजुनी जळते
चांदण्यात धागे जे जुळती

किती वर्षांच्या सहवासाची
रात चांदणी भर आशेची
कुठल्या स्वप्नांच्या गावाची
कोजागिरी उल्हास नावाची

एक सुरेखशी शांत धुंदी
धुंदीमधली मनं आनंदी
कोण कशी मग घालू शकेल
उधानलेल्या क्षणी पाबंदी

दि.३१/१०/२०२३
रात्री ११.४७ वा.



## (४०)
## होत जाय तू प्रकाश

लक्ष दीप हे उजळले नभी
त्यात चांदव्याची ज्योत हो उभी
जळते तरी आल्हादे पडे चांदणे
पुनवेच्या रातीचे गूढ वागणे

पाहिली का अशी कुणी पक्ष पाहुणी
गुडूप होत जाते कधी प्रकटते आणि
तेज तमाचे हे तिचे खेळ चालती
चांदण्यांच्या गावी बघा स्वप्ने डोलती

यश असते शुभ्र धवल जसे चांदणे
काळोख्या रातीचे शांत सांगणे
ती भयाण शांती विरणार एकदा
या इथेच लख्ख दिवे जळणार एकदा

पाठशिवणी सुखदुःखे येती जाती अन्
का बिलगे गुंतते हे भावमृदु मन
ऐक जरा माझ्या मना तुला सांगते
नजर तीक्ष्ण होता तमोराज्य पांगते

होत जाय तू प्रकाश रोज रोजचा
उजळू येऊ दे दिशा ना छंद आजचा
छेद भेद व्यूह पुन्हा लाव एक जोर
विसर कुट्ट अंधारही आज कालचा

दि.०१/११/२०२३
रात्री ११.०१ वा.



## (४१)
## नको चांदव्या तू उजळू

फेसाळल्या लाटा
सागरात चंद्र उसळतो
चांदण्याच्या बहाण्याने
मज मनी मिसळतो

रंग उजळतो दिशेचा
रंगते किती निशा
केवड्याचा गंध येई
कस्तुरीची शहानिशा

का कुणास बोलवी
मन प्रियास घोळवी
रात चढविते नशा
मदनदाह पोळवी

थांब लाटे थांब की
उधाणलेली तू सदा
सांग कसे सांगू मी
प्रियवरास प्रीत बा

तो अबोल मूकसा
नयन वाचतो जरी
शब्द ऐकण्या उरीचे
उन्मनी प्रिया परि

नको चांदव्या तू उजळू
आग मजसी जाळते
प्रीतफुलें मज सजनाची
रात केशी माळते

दि.२९/११/२०२३
सकाळी ०९.२३ वा.



## (४२)
## नीज नीज माझ्या बाळा...

झोळीमंदी काळजाचा
तुकडा मी झोपविला
आकाशाच्या देवा तुला
नवा चांद सोपविला

टक लावून बघतो
बाळ उंच आकाशाला
जणू कवेत घेतोया
भविष्याच्या परकाशाला

नजरेत त्याच्या खोड्या
अवखळ हालचाली
हात पाय दुडुदूडू
बाळविष्णू आला खाली

त्याच्या हासऱ्या मुखाचे
किती घेऊ रं मी पापे
त्याच्या काळजीत माझ्या
काळजाचा भाता कापे

ओढ येगळीच ऱ्हाई
त्याच्या सुखासाठी आई
धडपडते आविष्य
नगं काही मला काही

एक बी न आसू गळो
नजर न लागो कधी
आलं संकट कवा बी
त्याची माय पुढं उभी

जोजवीते राजा तुला
घास मोत्याचा देईन
लेकराच्या सुखासाठी
माय चंदन होईन

नीज नीज माझ्या बाळा
ग्वाड छकुल्या तान्हुल्या
नजरेत मायेना तू
माय मायेच्या सानुल्या
नीज नीज माझ्या बाळा ...

दि.१३/१२/२०२३
रात्री ०८.३८ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक – संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर – ४०० ००५

  ई–मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (सूर्य) - दिव्यांतरी, (तिच्यावरील प्रीत कविता) - नादश्रुती, श्वेता, (सकाळ-संध्याकाळ) - लाघव वेळा, (वेळा) - तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, (फुले) - अळुमाळु, सुरभी, (पशु) - खाणाखुणा, (पक्षी) - वैष्णवी, (स्त्रीजीवन) - स्वामिनी, मृणालिनी, (धरती-आकाश) - प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) - मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय–नवोदित – संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव – संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव – नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utmsource=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ५७
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ४६
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •